# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वे दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम कमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

## परिक्षा व मुल्यमापन मंडळ विभाग

कॉम्पलेक्स परिसर,एम.आय.डी.सी. रोड,
गडचिरोली–४४२६०५

दूरध्वनी क्रमांक:कार्यालय: ०७१३२–२२३३२०
ईमेल : ***coegondwana@gmail.com***


जा. क्र. गों.वि./परिक्षा वि./ ८४९/२०१८

दिनांक : २७/०३/२०१८

## अधिसुचना

विषय:– प्रथम गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांनी ॲप्रान परीधान करून दीक्षांत समारंभास उपस्थित राहणेबाबत.

संदर्भ:– विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रकाशीत केलेली गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांची यादी.
(जा.क्र.गो.वि./परीक्षा वि./५५/२०१८, दिनांक ४/१/२०१८ ची अधिसुचना)

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य तथा संबंधितांना कळविण्यात येते की, गोंडवाना विद्यापीठाचा पाचवा दीक्षांत समारंभ दि. ३१/३/२०१८ रोजी आयोजीत करण्यात आलेला आहे. उन्हाळी २०१७ च्या परीक्षेतील विविध अभ्यासक्रमाच्या गुणवत्ता यादीमधील प्रथम गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गुणवत्ता प्रमाणपत्र वितरीत करण्यात येणार आहे.

प्रथम गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांना दिनांक ३१/३/२०१८ रोजी सकाळी ०८:४५ वाजता विद्यापीठाच्या वित्त व लेखा विभागामधून रू.२००/– अनामत रक्कम भरून ॲप्रान/स्कार्फ प्राप्त करून घ्यावा. तसेच ॲप्रान परीधान करून व महाविद्यालयाचे ओळखपत्र घेऊनच दीक्षांत सभागृहामध्ये उपस्थित राहण्याबाबत आपल्या स्तरावरून कळवावे. ही विनंती.

संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली